




# गोदातीर समाचार

स्थापना-१९६२

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६४ वे * अंक ७७ * नांदेड * रविवार, दि. २३ मार्च २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211





# जरा याद करो कुर्बानी...

दीडशे ते दोनशे वर्ष इंग्रजांच्या पारतंत्र्यात असणाऱ्या भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले. अनेक जण फासावर चढले तर कित्येकांनी इंग्रजांच्या गोळ्या छातीवर झेलल्या. या वीर स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत माता इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त झाली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासा

ठी अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी छातीवर गोळ्या झेलल्या तर अनेक स्वातंत्र्य सैनिक हसत हसत फासावर चढले. भगत सिंग, राजगुरू आणि सुखदेव हे स्वातंत्र्य सैनिक देखील भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी हसत हसत फासावर चढले आणि शहीद झाले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावणारे स्वातंत्र्य सैनिक शहीद भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी इंग्रजांनी फाशी दिली होती.

आज २३ मार्च हा दिवस शहीदांच्या नावे कोरला गेला गेला आहे. आजच्याच दिवशी म्हणजे २३ मार्च १९३१ रोजी शहीद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या प्राणाचे बलिदान दिले. ९४ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी इंग्रजांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी दिली होती. देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी




आजचा दिवस संपूर्ण देशात शहीद दिवस म्हणून साजरा केला जातो. १९२८ मध्ये सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले होते. या कमिशनला विरोध म्हणून लाला लजपतराय यांनी मोठा मोर्चा काढला होता. सायमन कमिशनला विरोध करणाऱ्या लाला लजपतराय यांच्यावर इंग्रजांनी लाठीहल्ला केला. या लाठी हल्ल्यात लाला लजपतराय गंभीर जखमी झाले त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

लाला लजपतराय यांच्या मृत्यूनंतर संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट उसळली. लाला लजपतराय यांच्या मृत्यूनंतर देशातील जहाल गटाचे स्वातंत्र्य सैनिक कमालीचे चिडले. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव आणि अन्य जहाल क्रांतिकारकांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्याची शपथ घेतली.

लाला लजपतराय यांच्या मृत्यूच्या एक महिन्याच्या आतच या क्रांतिकारकांनी आपली शपथ पूर्ण केली आणि १७ डिसेंबर १९२८ रोजी ब्रिटिश अधिकारी सँडर्सला गोळ्या घालून ठार केले. काही काळ ते भूमिगत राहिले मात्र फितुरीमुळे ते पोलिसांच्या हाती लागले. ७ ऑक्टोबर १९३० रोजी इंग्लिश कोर्टाने भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावली. यानंतर भगतसिंग यांची शिक्षा कमी व्हावी यासाठी फेर याचिका दाखल करण्यात आली मात्र १० मार्च १९३१ रोजी ती याचिका कोर्टाने फेटाळली. २३ मार्च हा दिवस भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या फाशीसाठी निश्चित करण्यात आला. २३ मार्च १९३१ रोजी सकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आली. फाशीच्या वेळी या तिघांनी मेरा रंग दे बसंती चोला...हे गाणे गायले. फासावर लटकतानाही भारत मातेच्या या सुपुत्रांच्या चेहऱ्यावर कसल्याही प्रकारचे दुःख किंवा पश्चाताप नव्हता उलट भारत मातेसाठी फासावर जात असल्याचा अभिमान होता.

आजच्या दिवशी भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य ज्ञात अज्ञात शहिदांना शाहिद दिनी विनम्र अभिवादन!

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# रानफुलांच्या ताटव्यात

हिरव्याकंच तृणपात्यात
भरजरी कलाकुसर
गंधमाळून सजलेत
वळण वाटेवरचे डोंगर

हिरवट,पोपटी पानाला
जडली प्रणयी भूल
चाहूलीने वसंताच्या
फुलले इवलसं रानफुल

गुलमोहर,पळसाची
रानावनात मुक्त उधळण
मधुमालतीच्या फुलात
धुंदावलेत सारे क्षण

पांगरा,शेवगा,काटेसावर
यौवनात मूसमूसले
शिरीष,आंबा,चिंच पागो-यात मनसोक्त बहरले

जाईजुई सवे मोगराही
देहभर माळून सुगंध
जगणे,मरणे याच मातीत
श्वासाशी क्षणभरच ऋणानुबंध

कोवळ्या फुलांच्या
पाकळ्यावर फुलपाखर फीदा
रानफुलांच्या ताटव्यात
सौंदर्याचा खूलतो काशिदा

जन्म फुलांचा फुक्राचा
नाही जराही खंत
भांबावलेल्या श्वासात
होई कोमेजून अंत

**–रूपाली वागरे/वैद्य**
नांदेड
मो. ९८६०२७६२४१

# अबोली

अबोल गं अबोली
रंग तुझा किती गोड
नाही त्याला कसलीच तोड
रूसवा तुझा सोड ना
माझ्याशी जरा बोल ना...


अबोली गं अबोली
रूप तुझे छान छान
मनात तू विराजमान
रहस्य सारे उलगड ना
अबोला आता संपव ना...

अबोली गं अबोली
पाने तुझी कोवळी कोवळी
दिसते तू साधी भोळी
चूप नाही रडायचं आपलं ठरलं ना
आता तरी माझ्याशी बोल ना...

**–डॉ. अनुपमा कोटलवार**
शिवाजीनगर, नांदेड

# प्रा. वसंत गिरी यांचा हास्यानंदाचा खजिना- 'हास्यगिरी'

**पुस्तक परीक्षण**
**रामदास राजेगावकर**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९४२०२३३०३२




मानवी जीवन सुख दुःखाने भरलेले आहे. कितीही सुखसुविधा उपलब्ध असल्या तरीसुद्धा, ती व्यक्ती आनंदी असेलच असे नसते. या उलट ज्यांच्याकडे कोणत्याही सुखसुविधा उपलब्ध नाहित ते फारच दुःखी असतात असेही नाही. सुख, दुःख मानने हे, ज्या-त्या व्यक्तीच्या मानसिकतेवर अवलंबून असते. काही व्यक्ती जी साधने उपलब्ध आहेत त्यावर समाधान मानतात, तर काही व्यक्ती,कितीही सुखसुविधा, साधने उपलब्ध असली तरीही त्यांचे समाधान होत नाही. परिणामी ते नेहमीच दुःखी असतात आणि त्यांच्या दुःखाचे सावट सहवासा तील व्यक्तींवर सुद्धा पाडण्याचे प्रयत्न करतात. तात्पर्य हेच की, आपल्या दुःखात इतरांनाही ओढण्याचा प्रयत्न करतात.

जीवनात सुखी राहायचे असल्यास, आहे त्या परिस्थितीत आनंद मानला पाहिजे. आनंद मानण्यासाठी सगळ्यात प्रभावी आणि अगदी मोफत माध्यम म्हणजे हसणे आणि हसविणे.हसल्यामुळे त्या व्यक्तीचे दुःख कोठल्याकोठे पळून तर जातेच शिवाय आजूबाजूच्या व्यक्तींचे सुद्धा जाते.

हसण्याची ही अनमोल कला किंवा देणगी, निर्मात्याने फक्त मानवाला दिलेली आहे. तथापि तरस हा प्राणी आणि कुरबुरा हा पक्षी हसण्यासारखे आवाज काढतात, पण त्यांच्या हसण्यामागे कोणत्या भावना असतील हे सांगणे कठीण आहे. माणसाच्या हसण्यामागे असलेल्या भावना आपण निश्चीतपणे सांगू शकतो. आपल्याला आनंद झाला तर आपण हसतो, तर काही दुसरे हसतात, म्हणून हसतात. तर काही लोक, इतरांची होत असलेली फजिती पाहून हसतात. जर एखादी विशेष व्यक्ती आपल्या नजरेसमोर आली, तर आपल्याला आपोआपच हसू आल्याशिवाय राहत नाही. हसविणाऱ्या किंवा आपलंच हसं करून घेणाऱ्या, अशा व्यक्तीही भरपूर आहेत. हसण्यासाठी अशी अनेक कारणे असू शकतात. परंतु केवळ स्वतः आनंद भोगण्यासाठी आणि इतरांना आनंद वाटण्यासाठी म्हणजेच देण्यासाठी, जे निस्वार्थपणे कार्य करतात ते फार मोजकेच असतात. ते कार्य विनोदी साहित्यिक करतात.संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाची व आरोग्याची तळमळ असल्याने, त्यांनी लोकांना हसविण्यासाठी किंवा आनंद देण्यासाठी, हास्यगिरी हे ग्रंथरत्न म्हणजेच हास्यानंदाचा खजिना, खास आपल्यासाठी वसंत गिरी घेवून आले आहेत.

'हास्यगिरी' हा ग्रंथ नजरेस पडताच, त्याचे मुखपृष्ठ आपल्याला आकर्षित केल्याशिवाय राहणार नाही आणि हसण्याचा मोह आवरता येणार नाही , तद्वतच पुस्तकाचे अंतरंगात शिरण्याचा मोह झाल्याशिवाय राहणार नाही. असे ,सुंदर तथा आशयाला समर्पक मुखपृष्ठ, निखिल लंभाते यांच्या कुंचल्यातून साकार झालेले आहे. ठळक तथा वाचकांच्या सोयीची अक्षर योजना केली आहे, समर्थ प्रोसेस, पुणे यांनी. सदर पुस्तकाचे प्रकाशन, निखिल लंभाते आणि रुपाली अवचरे यांच्या, यशोदीप पब्लिकेशन्स, पुणे यांनी केले आहे. दोषमुक्त अक्षर जुळणी केली आहे, यशोदीप क्रिएशन्स, पुणे यांनी. डॉ. राजा धर्माधिकारी, प्रसिद्ध विनोदी वक्ते, लेखक, कवी, रंगभूमी कलाकार , परतवाडा. जि. अमरावती, यांनी या पुस्तकाला न्याय देणारी प्रस्तावना दिली आहे. सोबतच पुस्तकाची पाठराखण सुद्धा त्यांनीच केलेली आहे.

अगदी विद्यार्थी दशेत असतांना लेखक प्रा. वसंत गिरी यांनी, आचार्य अत्रे,श्री. कृ. कोल्हटकर,चिं. वि.जोशी, राम गणेश गडकरी यांच्या साहित्यचे वाचन केले आहे.प्राचार्य राम शेवाळकर, कुलगुरू शिवाजीराव भोसले, सुरेश भट, द. मा. मिरासदार, शंकर पाटील , मंगेश पाडगांवकर, विं. दा. करंदीकर, भालचंद्र नेमाडे, निर्मलकुमार फडकुले, बॅरिस्टर पी. जी. पाटील, अनिल बर्वे, व्यंकटेश माडगूळकर, मिर्झा बेग, डॉ. राजाभाऊ धर्माधिकारी, किशोर बळी, इत्यादी अनेक विनोद वीरांना तथा साहित्यिकांना ऐकले,अभ्यासले.यापैकी अनेकांचा त्यांना सहवास लाभला. यातुनच काही ख्यातनाम साहित्यिकांशी त्यांची मैत्रीही जडलेली आहे. अशा ज्येष्ठ श्रेष्ठ साहित्यिकांचे विचार कण वेचून त्याची एक ग्रंथरुपी मोठी इमारत उभारण्याचे कार्य लेखकाने केले आहे.

आपल्या ग्रंथातून वसंत गिरी व्यक्त होतांना म्सणतात.

'विनोदीवृत्ती वास्तवाचे भान देते.' अत्यंत हळवी, अति भावनिक मानसे थोड्याशा कारणाने कमालीची दुःखी कष्टी होतात. सुडाणे पेटून उठतात. त्यांच्यातील असूरी प्रवृत्ती जागृत होते किंवा वैफल्याच्या दिशेने जाऊन आपला जीवनमार्ग नकारात्मक दिशेने नेतात. याउलट विनोदी माणसे स्वतःवर विनोद करून घेण्यात धन्यता मानतात. माझ्यातील व्यंगामुळे मी, सर्वांना हसू शकलो, हा त्यांच्या आनंदाचा विषय असतो. ते खोट्या प्रतिष्ठेची झूल घेऊन कधीही मिरवत नाहीत. विनोद बुद्धीने मन, मेंदू व मस्तिष्क कार्यक्षम होते.' अती तान तणाव, कामाचा व्याप यामुळे मानवी मेंदू निष्क्रिय होत जातो,परंतु जी व्यक्ती या कार्यासोबतच हास्यानंदही घेते त्या व्यक्तीचा मेंदू अधिक कार्यक्षम होतो. हास्य, आनंदाला किती महत्त्व आहे? हे या ठिकाणी अत्यंत विनोदी पद्धतीनेच विषद केले आहे. लेखक, विनोदाला मानवी जीवनाचा अमृतकुंभ असे म्हणतात.

विनोद मानवी जीवनाला किती हितकारक आहे? हे दर्शविण्यासाठी लेखकाने खालील प्रमाणे मुद्यांचा आधार घेऊन विनोदाविषयी विनोदी पद्धतीनेच भरभरून लिहिले आहे. विनोद प्रगल्भतेची जाणीव देणारा जीवन धर्म, विनोद वास्तवतेचा बोध देतो, विनोद आत्मपरीक्षण करायला लावतो, विनोद जीवनातील कलह दूर करतो, विनोद बुद्धीने लोकशाही प्रगल्भ होते, विनोदाची आयुधे विनोद प्रांत समृद्ध करतात, प्राचीन साहित्यात विनोदाला गौण स्थान, विनोदाने अहंकार व विकृतीचा नाश व्हावा, तणाव मुक्तीचा मार्ग आनंद शतगुणित करणारा, या व अशा मुद्यांचा विचार केला तर, मानवाने आपल्या जीवनात विनोदाला अग्रस्थान दिले तर संपूर्ण मानवजातीचे कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही.

याशिवाय या पुस्तकामध्ये बरेच काही आहे. ते कळण्यासाठी पुस्तकच वाचावे लागेल. पुस्तक वाचतांना तर खूपच हसायला येते. मी तो अनुभव घेतला आहे. हसण्याच्या क्रियेला शब्द नाहीत म्हणून कागदावर हसून दाखविता येत नाही. आपण स्वतः पुस्तक वाचन करा आणि हास्यानंदाचा मनमुराद आनंद घ्या. आपण आनंद घ्या आणि दुसऱ्यांनाही द्या. लेखक प्रा.वसंत गिरी यांनी लोकहिताच्या तळमळीतून, 'हास्यगिरी' हा अमृतकुंभ आपल्याला उपलब्ध करून दिला. त्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार!तसेच त्यांच्या पुढील लेखन प्रवासाला खूप खूप शुभेच्छा! मनापासून धन्यवाद!

**पुस्तकाचे नाव- हास्यगिरी**
**लेखकाचे नाव - प्रा. वसंत गिरी**
**मो. ९०११२२९२३२.**
**प्रकाशकाचे नाव- यशोदीप पब्लिकेशन्स पुणे**
**पृष्ठे - १६८**
**मूल्य-रु. २५०/-**

# बुंदा गोळ नोता...

**वऱ्हाडी कथा**

काय रे गन्या? चलत नाही काय बे चिंटीच्या लगनाले.

बाळाराम बोल्ला.

कुठ्सा हाय लगन तात्या.

कुठं असन.

मरीमायच्या देवळात.

मंग अवघं त मालूम हाय तुले. आपल्या गावचे लगन तथिसाच असतेत. तरी मले ईचारत. कुचीनवानाच्या.

आज हाय काय लगन.

कामून अकशद देल्ली नाही काय त्वाल्या घरी. देल्ली पन् लगन कवा हाय त इसरलो मी. अबे भैताळ्या अजच हायनं लगन. तुले बॅन्डचा अवाज नाही येवू राह्यला काय. काय कानात त्वाल्या भेंड गेलं.

मी त चाल्लो तू येशीन त ये ब्वा.

असाच येवू काय? मयकटले कपळे घालूनं. तुमी जा पुळे. मी बात येतो तयारी करून.

गन्या घरी जाते. चांगभांग करून साजरे कपळे घालून येते.

लगन होते. सुई लगन लागते. अन् लोक धळाल पट्यावर जावून बसतात. पतरवाई येते, मीठ येते, गीलास येते, पानी येते,शेव येते, भात, सराट्यानं कापेल पोई, तर्रीची आलू वांग्याची भाजी, बुंदा, लुंजी, वरन ... लोक दाबून खातात. हजारक लोक जेवूनं जातात. नवरी लळत सार होते. बाळाराम अन् गन्या संध्याकायी गोठानावर भेटतात.



काय मंग गन्या कस होत लग्नातल जेवनं.

हुट राजेहो.चव तरी होती काय जेवनाले. साजरी जिल्बी ठेवावं त ठेवला बुंदा नि-हा दानोळा.. अन् बुंदा गोळही नोता. काजून पाकात टाकला का नायी त. आलूवांग्याची भाजी त नि-हा पांचट होती. शेव जरा बारीक पाह्यजे होते. भात त कंटोलाच्या तांदूयाचा होता राजेहो. थोच लगनाले जमा करूनं ठुयला होता काय त. साजरा बासमती ठुवा लागत होता. दा पोते यवळ्या तुरी झाल्या तरी वरन त नि-हा ढो पानीचं होतं. पोया इतल्या जाळ्या असतेत काय. बापा बापा नि-हा रोडगा. लुंजीत नि-हा आंबटडकच गुय टाकला काय नाही काजूनं. अस गन्या बोलत होता अन् बाळाराम आयकत होता.

मले एक सांग गन्या तू दररोज घरी काय खात. बेसन भाकर, चटनी भाकर, वरन भाकर, सोले भाकर नाहीत भरीत भाकर.

तरी ईतल्या साज-या जेवनाले नाव ठुवत. बुंदा गोळ नोता म्हनत. बुंदा काय अचा-यानं पान्यात डुबोला काय. अबे थ्या चिंटीच्या बापाले तीच्या लगनासाठी खळकू खळकू जमा करतानी म्या पाह्यलं. जीवाले खाये ना थो कवा. दिसरात त्याची मरमर म्या पाह्यली. ईस हजार हुंडा देवूनं साजरी पक्की रसोईची पंगत देल्ली त्यानं अन् तू त्याच्या अवघ्या जिंदगी भरच्या कष्टाले बोट दाखोत लेका. वाह रे वाह पठ्ठया. अबे मी त अस म्हनन पोरीच्या बापानं तुमच्या सारख्या कुत-याईले जेवूचं ना घालावं. खावू घालाव त घालाव अन् वदरूनं नाव ठुयता. वाह रे वाह कलीयूग. बाळारामचे शबूद आयकूनं गन्या ढसढस लळाले लागते. बाळाराम भाऊ तुमी माह्ये डोये खोल्ले हो. मी शप्पत खातो अजपासूनं कोन्याच लगनात मी जेवनार नाही....अन् कोनाले नावबोटही ठुयनार नाही.

**–सु. पुं. अढाऊकर**
अकोला.
मो. ९७६९२०२५९७

# बदलते हवामान संपूर्ण सृष्टीसाठी चिंताजनक

जगातील भयावह घटना पहाता बदलत्या हवामानावर नियंत्रण ठेवणे काळाची गरज. जगात महाप्रलय,भुकंप, सुनामी,वनवे लागणे, ज्वालामुखीचा उद्रेक,अवकाळी पाऊस,अती उष्णता,अती थंडी, ग्लेशियर वितळणे, समुद्राची पातळी वाढने किंवा येणाऱ्या नैसर्गिक आपदा याची सुचना यावर नियंत्रण कसे ठेवता येईल व येणाऱ्या नैसर्गिक आपदांची माहिती कशी मिळु शकेल याउद्देश २३ मार्च १९५० ला जागतिक हवामान संस्थेची स्थापना करण्यात आली.

यापूर्वी १९२२ ला हवामान शास्त्रज्ञ लुइस फ्राय रिचर्डसन यांनी हवामानाच्या अंदाजाचा शोध लावुन हवामान पहाण्याकरीता सांख्यिकी पध्दत शोधून त्यानुसार काही प्रमाणात हवामान अंदाज वर्तविता येऊ लागले व हवामानाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे काम केले. हवामान शास्त्रज्ञ लुइस फ्राय रिचर्डसन यांनी लावलेला शोध आज जगाला अत्यंत कारगर आणि गुणकारी सिध्द झाल्याचे आपण पहातो.त्याच अनुषंगाने १९५० ला जागतिक हवामान संस्थेची (डब्लुएमओ) स्थापना करण्यात आली. या संस्थेचे मुख्यालय स्वित्झर्लंड येथील जिनेव्हा येथे आहे. यानंतर (डब्लुएमओ) संयुक्त राष्ट्राची (युएन) विशेष संस्था बनली. पहिला जागतिक हवामान दिवस २३ मार्च १९६१ रोजी साजरा करण्यात आला. त्यावेळी ३१ सदस्य देश होते. आता या आंतरराष्ट्रीय संघटनेचे १९३ देशांपेक्षा जास्त सदस्य आहेत.

पर्यावरणातील वाढते बदल याबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या अनुषंगाने या दिवसाला अत्यंत महत्व आहे.गेल्या २० वर्षात युद्धजन्य परिस्थिती, वाढते औद्योगिकीकरण, परमाणु परिक्षण, मोठ्या प्रमाणात जंगलतोड इत्यादी अनेक कारणांमुळे हवामानातील बदलाने जगातील पर्यावरणाची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे.कारण आज जगातील पर्यावरण अत्यंत धोकादायक व भयावह स्थितीत येवून ठेपले आहे.यामुळे मानव,पशु-पक्षी व संपूर्ण जीवसृष्टीला मोठा धोका निर्माण झाला आहे. आज जगामध्ये वाढते औद्योगिकीकरण, वायुप्रदूषण, जंगलतोड, युद्धजन्य परिस्थिती, वाढती उष्णता, वाढती लोकसंख्या यामुळे हवामानात रोज वेगवेगळे आमुलाग्र बदल होतांना आपण पहातो. जगात महाप्रलय, त्सुनामी, भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक, अती पाऊस, अती थंडी, अती उष्णता, वणवे लागणे, नैसर्गिक आपत्ती अशा अनेक घटना जगात मानवाच्या अतिरेकामुळे दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या येणाऱ्या आपदांची सटीक माहिती हवामान विभाग जगभर देत असते. यामुळे जगातील देश सतर्कता बाळगुन सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पाऊले उचलतात. त्यामुळे आपण समजू शकतो की, हवामान खात्याची भूमिका जगासाठी अत्यंत मोलाची आणि महत्त्वाची आहे.



आज अत्याधुनिक युगात उपग्रहांच्या (सेटेलाईटच्या) माध्यमातून हवामानातील बदलांचे संकेत हवामान संस्था जगभरातील संपूर्ण देशांना वेळोवेळी देत असते. हवामानातील बदलांचे संकेत लोकांमध्ये जागृता निर्माण करण्याचे काम करीत असते. हवामान दिनाचे औचित्य साधून व हवामानातील वाढते बदल व धोका पहाता निसर्गाला संतुलित ठेवणे गरजेचे आहे.याकरीता जगातील संपूर्ण देशांनी हवामानातील मोठ्या प्रमाणात वाढते बदल पहाता आजच्या दिवसाला जास्तीत जास्त वृक्षारोपण करने अत्यंत गरजेचे आहे. यामुळे वाढत्या हवामानातील बदलांवर नियंत्रण ठेवण्यास मोठी मदत होईल. सोबत निसर्ग प्रफुल्लित राहुन संपूर्ण जंगलातील पशु-पक्ष्यांसाठी एक आल्हाददायक वातावरण निर्माण होईल. कारण हवामानाचे संपूर्ण गणित निसर्गावरच अवलंबून आहे. त्यामुळे निसर्ग सुरक्षित रहाला तर हवामान सुध्दा सुरक्षित राहू शकते.याचा फायदा संपूर्ण जगाला व जीवसृष्टीला होईल.

**–रमेश लांजेवार**
नागपूर
मो.९९२१६९०७७९

## थोडक्यात...

### विद्यापीठांतर्गत पीएच.डी कोर्सवर्क परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत घेण्यात येणाऱ्या पीएच.डी. कोर्सवर्क हिवाळी-२०२४ परीक्षेचे आयोजन दि.२४ व २५ मार्च रोजी ऑफलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहेत.

पीएच.डी. कोर्सवर्कच्या परीक्षा विद्यापीठ परिक्षेत्रातील तीन जिल्ह्यांमध्ये घेण्यात येणार आहेत. यामध्ये नांदेड येथील आय.टी.एम. कॉलेज नांदेड, परभणी येथील शारदा महाविद्यालय आणि लातूर येथील दयानंद कला महाविद्यालय या केंद्रावर पीएच.डी. कोर्सवर्क परीक्षा घेण्यात येणार आहेत.

सदर परिक्षेचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे. दि. २४ मार्च रोजी स. ११:०० ते दु. २:०० वा. दरम्यान रिसर्च मेथोडोलॉजी या विषयाची परीक्षा होणार आहे. दि. २५ मार्च रोजी स. ११:०० ते दु. १:०० वा. दरम्यान कॉम्प्युटर ऍप्लिकेशन या विषयाची परीक्षा होणार आहे.

### आज लसाकमची बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)–** कर्मचाऱ्यांच्या विविध विषयांवर व सामाजिक प्रश्नांसाठी लसाकम नांदेड जिल्हा शाखेच्यावतीने आज दि. २३ मार्च रोजी सकाळी ११.३० वाजता कॉम्रेड दत्ताजी दशमुख सभागृह वर्कर्स फेडरेशन कार्यालय नवा मोंढा येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर बैठक लसाकमचे जिल्हाध्यक्ष विजय रणखांब यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. या बैठकीत लसाकमचे मार्गदर्शक शिवा कांबळे, महासचिव गुणवंत काळे, कोषाध्यक्ष डी. एम. तपासकर, चंद्रकांत मेकाले, अण्णासाहेब तोडे, शिवाजीराव टोम्पे, मल्हारराव तोटरे, शिवाजीराव कासारकर, सुग्रीव अंधारे, प्रकाश ईश्वरे, नारायणराव पोतरे, ल.मा.शेवाळकर, नागोराव भांडवले, एस.जी.भोसले, यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

# माजी खा. खतगावकर, पोकर्णा आणि डॉ. मीनल खतगावकर करणार आज 'दादां'च्या उपस्थितीत राष्ट्रवादीत प्रवेश





**नांदेड (प्रतिनिधी)–** माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, त्यांच्या स्नुषा डॉ. मीनल खतगावकर आणि माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा यांच्यासह त्यांचे शेकडो कार्यकर्ते आज रविवार, दि. २३ मार्च रोजी नरसी ता. नायगाव येथे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये जाहीर प्रवेश करणार आहेत. त्यांच्या प्रवेशामुळे जिल्ह्यात कॉंग्रेसला मोठा हादरा बसणार आहे.

नांदेड जिल्ह्यातील राजकारण वेगाने बदलत आहे. लोहा-कंधार मतदारसंघाचे प्रताप पाटील चिखलीकर राष्ट्रवादीचे आमदार झाल्यापासून दादांच्या पक्षाला अच्छे दिन आले आहेत. आ. चिखलीकर यांच्या पुढाकाराने भाजप, कॉंग्रेस, शिवसेना या पक्षातील अनेक नेते, पदाधिकारी राष्ट्रवादीत दाखल होत आहेत. आता तर आ. चिखलीकर यांनी जिल्ह्यातील जेष्ठ नेते तथा माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांचे भावोजी भास्करराव पाटील खतगावकर यांना पुन्हा एकदा आपल्यासोबत आणले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रमुख अजित पवार यांच्याशी झालेल्या चर्चेअंती दादांनी राष्ट्रवादीत समर्थकांसह दाखल होण्याचे ठरविले. दादांसोबत त्यांच्या स्नुषा डॉ. मीनल पाटील खतगावकर, माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार अविनाश घाटे या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह शेकडो कार्यकर्त्यांसह पक्षाचे नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत नरसी येथे होणाऱ्या सोहळ्यात राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत. दरम्यान नरसी येथील या सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे.

अजित पवार यांच्या स्वागतासाठी नांदेड शहर, देगलूर नाका, सांगवी आसना बायपास, कामठा- गाडेगाव फाटा, धनेगाव, चंदासिंग कॉर्नर, नायगाव ते पुढे नरसी सभास्थळापर्यंत मोठ्या प्रमाणात होर्डिंग्ज लावण्यात आले आहेत.

# मनपाच्या अर्थसंकल्पामध्ये सिडको क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत नवीन प्रकल्प उभारणीसाठी व अनेक योजनांसाठी तरतूद




**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात सिडको क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत नवीन प्रकल्प उभारणी व अनेक योजनांसाठी तरतुदी करण्यात आली आहे. दि. २१ मार्च रोजी मनपाचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी अर्थसंकल्प सादर केला. यावेळी तदतुदी करण्यात आल्या.

नांवामनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत गेल्या अनेक वर्षांपासून विविध योजनांसह अनेक प्रकल्पांकडे दुर्लक्ष होत होते. यासंदर्भात मनपा आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त अजितपाल संधू यांच्याकडे केलेल्या मागण्या व माजी लोकप्रतिनिधींचा पाठपुरावा यामुळे व सहायक आयुक्त डॉ.मिर्झा बेग यांनी केलेल्या सतत पाठपुराव्यामुळे अर्थसंकल्पात सिडको झोनअंतर्गत बऱ्याच कालावधीनंतर अनेक प्रकल्प व सुविधा उपलब्ध होणार आहेत. यात सिडको क्षेत्रीय कार्यालय क्रमांक ६ अंतर्गत हडको भागातील साई मंगल कार्यालय नुतनीकरण, क्रिडा संकुल उभारण्यासाठी १ कोटीची तरतूद करण्यात आली. तर सिडको भागात जलतरणिका व नवीन उद्यान विकसित करण्यात येणार आहे.

सिडको येथील वापरत नसलेल्या मलःनिस्सारण प्रकल्पाचा जागेवर जलतरणिका व उर्वरित जागेवर उद्यान विकसित करण्यात येणार आहे. नांदेड शहराची वाढती लोकसंख्या पाहता सहलीसाठी शहराजवळ एखादे पर्यटनस्थळ असण्याची आवश्यकता असल्याने शहरातील नागरिकांना कौटुंबिक सहलीसह निसर्ग सौंदर्य, वॉटर स्पोर्ट्स यासह विविध खेळांच्या आस्वाद घ्यावा यासाठी महानगरपालिकेने किवळा साठवण तलावजवळील महानगरपालिकेच्या मालकीची १८ एकर पैकी १० एकरवर थीम पार्क, स्पोर्ट्स व अम्युजमेंट पार्क उभारणीसाठी बांधा वापरा व हस्तांतरित करा, या तत्वावर खाजगी व्यवसाय सहभागासह निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. सदरील प्रकल्पा मुळे शहरातील प्रमुख पर्यटन यादीत एक नवीन पर्यटनस्थळ भर पडण्यास मदत होणार आहे. सन २०२५-२६ या वर्षांत यासाठी एकूण पाच कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे.

यासह साई मंगल कार्यालय हडको नूतनीकरणासह क्रिडा संकुल उभारण्यासाठी १ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. असदवन टेकडीवर वनोउद्यान तयार करण्यात येणार असून वृक्षारोपण व वन पर्यटनदृष्टीने वनीकरण सारख्या सुविधा निर्माण करून सिडको -हडको भागातील नागरिकांना निसर्ग पर्यटनस्थळ उभारणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच सिडको ग्रंथालय ईमारतीवर सौरऊर्जा प्रकल्प उभारणी काम पूर्ण झाले असल्याने विद्युत देयकामध्ये सहा लक्ष बचत होत आहेत. तर सिडको क्षेत्रीय कार्यालय नुतनीकरण करण्यात येणार असून या ठिकाणी नागरिकांसाठी अभ्यागत कक्ष, कर्मचाऱ्यांसाठी पुरेशी बैठक व्यवस्था व कार्यालय संगणकीकरण करण्यात येणार आहे. यासह अनेक सुविधा अर्थसंकल्पात मांडल्या आहेत.

# उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी नांदेड जिल्ह्यातील महत्वाचे प्रश्न सोडवावेत

## माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांची निवेदनाद्वारे मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे नांदेड जिल्ह्यातील अनेक महत्वाचे प्रश्न सोडविण्याची मागणी माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

नांदेड जिल्ह्यातील महत्वाचे प्रश्न बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित आहेत. यामध्ये लेंडी धरणाचे काम पुर्ण करणे, मनार धरणाच्या कॅनॉलच्या सिमेंट कॉक्रीटच्या लाईनिंगचे काम मंजूर करणे, कोलंबी उपसा जलसिंचन (लिफ्ट एरिगेशन) योजना मुळ आराखड्याप्रमाणे मंजुर करणे, (मांजरम, कोलंबी, कुष्णूर, पाटोदा बु. व कहाळा, टाकळगाव) गावच्या जमिनीला शेतकऱ्यांना पाणी देणे, गोदावरी मनार सहकारी साखर कारखाना शंकरनगर ता. बिलोली येथे आएफसीआयचा प्रश्न सोडविणे, नांदेड-नायगाव-नरसी-देगलूर-बिदर रेल्वे (लाईन) मार्ग मंजुर करणे, बोधन-बिलोली-नरसी-मुखेड-रेल्वे (लाईन) मार्ग मंजुर करणे, नांदेड-नरसी-देगलूर-हैद्राबाद रस्ता चौपदरीकरण करणे. मनार व लेंडी नदीवर उच्च पातळीचे कोल्हापुरी पध्दीचे बंधारे (बॅरेज) बांधणे, नांदेड येथे मंजूर असलेले महसुल आयुक्तालय मंजूर करावे अशा मागण्या उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर यांनी केल्या आहेत.

# सोशल मीडियावर दोन समाजात तेढ निर्माण होईल अशी पोस्ट व्हायरल करू नये

## नांदेडकरांना पोलीस दलाकडून आवाहन



**नांदेड (प्रतिनिधी)–** आपण कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, तसेच खोट्या अफवा पसरवू नये, सोशल मीडियावर दोन समाजात तेढ निर्माण होईल किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल अशी पोस्ट करू नये, असे आवाहन नांदेड जिल्ह्यातील नागरिकांना नांदेड पोलीस दलाकडून करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने सोशल मीडिया मॉनिटरिंग दरम्यान सायबर पोलीस स्टेशनकडून जानेवारी २०२५ ते अद्यापपावेतो १२५ इंस्टाग्राम अकाऊंटची पूर्ण माहिती काढून संबंधित पोलीस स्टेशन यांना त्यावर कारवाई करण्यासाठी पाठविण्यात आलेली आहे आणि त्यावर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पाठविण्यात आलेल्या माहितीवरून आतापर्यंत भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ कलम १६८ नुसार तीन कारवाया करण्यात आल्या आहेत. नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन गु.र.नं. २२१/२०२५, २२२/२०२५, २२३/२०२५ कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा प्रमाणे व इतवारा पोलीस स्टेशन ३९/२०२५ कलम १२२ लोकप्रतिनिधी अधिनियम प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच दोन समाजात तेढ निर्माण होईल, असा मजकूर सोशल मीडियावर प्रसारीत केल्याने पो. स्टे. कंधार गु. र. क्र. ७२/२०२५ कलम ३५३(२) भारतीय न्याय संहिता व तामसा गु. र. क्र. ५३/२०२५, ५४/२०२५, कलम ३५३ (२) भारतीय न्यायसंहिता कायद्याप्रमाणे असे एकूण ७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. समाजामध्ये दहशत पसरविणारे व्हिडीओ तसेच आक्षेपार्ह पोस्ट डिलीट करण्यात आल्या आहेत. आक्षेपार्ह पोस्ट अपलोड करणाऱ्या इसमांवरती योग्य ती प्रतिबंधात्मक / कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

नांदेड जिल्हा पोलीस दलाचे सर्व बाबींवर बारकाईने लक्ष असून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे. जिल्ह्यातील शांतता अबाधित ठेवणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. काही सामाजिक, धार्मिक बाब निदर्शणास आल्यास नजीकच्या पोलीस स्टेशनला संपर्क करावा. उपरोक्त गुन्हयात काही विधीसंघर्ष बालकांचा समावेश असल्याने पालकांने त्यांचे मुलांचे सोशल मीडियावर लक्ष ठेवून दोन समाजात तेढ निर्माण होणारे स्टेटस/ वक्तव्य सोशल मीडियावर प्रसारीत करणार नाहीत, याची दक्षता घ्यावी असे आवाहन पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी आवाहन केले आहे.

# 'स्वारातीम' विद्यापीठात राज्यस्तरीय वक्तृत्व व काव्यवाचन स्पर्धा

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने दि. २८ व २९ मार्च रोजी खुल्या राज्यस्तरीय वक्तृत्व व काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनींच्या प्रतिभा आणि अभिव्यक्तीसाठी भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिजन्म शताब्दीच्या निमित्ताने विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यस्तरीय खुल्या वक्तृत्व व काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

दि. २८ मार्च रोजी स. १०:३० वा. विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहामध्ये राज्यस्तरीय खुल्या 'वक्तृत्व स्पर्धेचे' आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेसाठी १) भारतीय संविधान: जगण्याचा पाया, चालण्याचे बळ, २) आदर्श राज्यकर्त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, ३) भारतीय शिक्षण पद्धती: काल, आज आणि उद्या, ४) विकसित भारत, ५) राष्ट्र उभारणीत माझी भूमिका हे विषय देण्यात आले आहेत. स्पर्धकांना बोलण्यासाठी ५ ते ७ मिनिटांचा वेळ दिलेला असून विजेत्या स्पर्धकास प्रथम पारितोषिक रु. २१०००, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक रु. १५०००, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय पारितोषिक रु. ११०००, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र तसेच उत्तेजनार्थ ५ पारितोषिके दिले जाणार आहेत त्यामध्ये प्रत्येकी रु. २०००, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

दि. २९ मार्च रोजी स. १०:३० वा. विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात राज्यस्तरीय 'काव्यवाचन स्पर्धा' संपन्न होणार आहे. यामध्ये स्पर्धकाला ५ मिनिटे वेळ दिला असून स्वरचित एकच कविता सादर करता येणार आहे. संयोजकानी घालून दिलेल्या नियम व अटीनुसार या स्पर्धा होणार आहेत. काव्यवाचन स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकास १) प्रथम पारितोषिक रु. ११०००, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक रु.७०००, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय पारितोषिक रु. ५०००, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र तसेच उत्तेजनार्थ ५ पारितोषिके देण्यात येणार आहेत. त्यामध्ये प्रत्येकी रु. १०००, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र असे पारितोषिकाचे स्वरूप आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार आज नांदेड जिल्हा दौऱ्यावर



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आज रविवार, दि. २३ मार्च रोजी विविध कार्यक्रमानिमित्त नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. आज सकाळी त्यांचे नांदेड येथील श्री. गुरु गोविंदसिंघजी विमानतळावर आगमन होणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सकाळी १०.१५ वाजता श्री. गुरु गोविंदसिंघजी विमानतळावर आगमन होईल. त्यानंतर वाहनाने ते नरसी नायगावकडे प्रयाण करतील. ११ वाजता नरसी, नायगाव येथे आगमन व येथील पक्षप्रवेश सोहळा कार्यक्रमात ते सहभागी होतील. दुपारी २.४० पर्यंत नरसी नायगाव येथे त्यांची वेळ राखीव असून येथील कार्यक्रम संपल्यानंतर शिवराज पाटील होटाळकर यांच्याकडे ते भेट देणार आहेत.

दुपारी ४ वाजता जिल्ह्यातील सांगवी येथील स्वागत लॉन येथे नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली येथील सर्व लोकप्रतिनिधी व पक्षीय पदाधिकाऱ्याच्या बैठकीत ते सहभागी होतील. सायंकाळी ६.३० वाजता नांदेड येथील हैदर गार्डन इफ्तार पार्टीमध्ये ते सहभागी होतील. त्यानंतर ७.५५ वाजता गुरु गोविंदसिंघजी विमानतळावरून मुंबईसाठी ते प्रयाण करतील.




**नांदेड :** बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत राष्ट्रपती, बिहार व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस अनुसूचित जाती विभागाच्यावतीने देण्यात आले. यावेळी सत्यपाल सावंत, प्रफुल्ल सावंत, ॲड. नितीन थोरात, रत्नाकर जोंधळे, रामचंद्र गायकवाड, शेख मुख्तार, डॉ. रत्नदिप गच्चे, शिवराज कांबळे, गोविंद पाटील, तुषार पोहरे, गौतम शिरसाट, तथागत ढेप दिसत आहेत. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)

# प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** देशातील युवकांना कंपनी, आस्थापनेमध्ये अनुभवाची संधी प्राप्त करून देण्यासाठी भारत सरकारने प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना अर्ज प्रक्रिया सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत २१ ते २४ वर्षे वयोगटातील तरुणांना इंटर्नशिप दिली जाणार आहे. प्रधानमंत्री इंटर्नशिपसाठी नांदेड जिल्ह्यात एकूण ११ आस्थापनांनी http://pminternship.mca.gov.in/ यासंकेतस्थळावर रिक्तपदे अधिसुचित केलेली आहेत.

या योजनेचा जिल्ह्यातील दहावी, बारावी, ग्रॅज्युएट, आयटीआय या शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त रेणूका तम्मलवार यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक ०२४६२-२५१६७४ वर संपर्क साधावा, असेही कळविले आहे.

कंपनी, आस्थापनाचे नाव बजाज फायनान्सं लि., बायरक्रॉप सायन्सं लि., हॅवेल्स इंडिया लि. गोदरेज कंज्यूमर प्रॉडक्ट्स लि., एच.डी.एफ.सी. बँक लि., इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि., इंड्युसंड बँक लि. ज्युब्लीयंट फुड्वर्कस लि., रिलायंन्स इंडस्ट्रीज लि., मेघा इंजिनियरिंग इन्फ्रास्ट्रक्चरलि. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लि. या नामांकीत कंपनी/आस्थापना यांनी http://pminternship.mca.gov.in/ यासंकेतस्थळावर रिक्तपदे अधिसूचित केलेली आहेत. यासाठी उमेदवाराचे वय २१ ते २४ पर्यंत असावे व दहावी/बारावी/ ग्रॅज्युएट/ आय.टी.आय. या शैक्षणिक पात्रतेचे उमेदवार अर्ज करू शकतात.

# संत नामदेव महाराज यांच्या महाराष्ट्र धर्माला उजाळा देण्याची गरज -डॉ. श्रीरंग गायकवाड

**नांदेड (प्रतिनिधी)–** समाजातील बंधुभाव, एकोपा, सलोखा घट्ट करण्यासाठी संत श्री नामदेव महाराज यांच्या कार्याला उजाळा मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक तथा ज्येष्ठ पत्रकार डॉ. श्रीरंग गायकवाड यांनी येथे केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील श्री गुरू गोविंदसिंघजी अध्यासन संकुल व नानक साई फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'श्री संत नाम देवजी महाराज: लौकिक व वाङ्मयीन योगदान' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, श्री गुरू गोविंदसिंघजी अध्यासन संकुलाचे संचालक डॉ. दीपक शिंदे, नानक साई फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार पंढरीनाथ बोकारे, गुरुद्वारा बोर्डाचे माजी अध्यक्ष सरदार लड्डूसिंघ महाजन आदी उपस्थित होते.



डॉ. गायकवाड म्हणाले, 'पंढरीच्या श्री विठ्ठलाचा समता, बंधुभावाचा संदेश देशभर पोहचवण्यासाठी संत नामदेवांनी भ्रमंती केली. पंजाबमध्ये जाऊन शीख धर्माचा पाया घातला. समाजातील विविध स्तरांमधून, उपेक्षित घटकांमधून संत घडवले. समाजात सलोख्याची भावना रुजवली. समाजातील हा एकोपा टिकवण्यासाठी आपणही त्यांच्या विचारांचे अनुसरण करणे गरजेचे आहे. तेराव्या शतकात मराठवाड्यातील संत नामदेव महाराज यांनी दक्षिणेपासून ते पंजाब, उत्तर भारत आणि अफगाणिस्तान भागात जाऊन मानवता आणि भक्तिभावाची शिकवण दिली. समाजात समता, बंधुता ही मूल्ये आणखी मजबूत होतील, असे डॉ. गायकवाड म्हणाले.

यावेळी बोलताना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी विद्यापीठातील श्री गुरुगोविंद सिंगजी अध्यासन केंद्र हे आगामी काळात आपली वेगळी ओळख निर्माण करेल असा विश्वास व्यक्त केला. या केंद्रातून सर्व धर्म समभावाची शिकवण देणारे व्याख्याने व नवीन अभ्यासक्रम राबविले जातील असेही ते यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री गुरुगोविंद सिंघजी अध्यासन संकुलाचे संचालक डॉ. दीपक शिंदे यांनी केले तर सूत्रसंचलन व आभार प्रा. रुबीना शेख यांनी मानले. कार्यक्रमास जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, विद्या परिषदेचे सदस्य डॉ. बाबुराव सुरवसे, पत्रकार आनंद कल्याणकर, प्रा. के.एच. दरक, शिंपी समाज संघटनेचे अध्यक्ष शंकरराव सिंगेवार, गुरुद्वारा बोर्डाचे जनसंपर्क अधिकारी राजेंद्रसिंग सोडी, दैनिक सकाळचे उपसंपादक प्रसाद खेकाळे, डॉ. अविनाश कदम, यशवंतराव चव्हाण अभ्यास केंद्राचे शिवाजीराव गावंडे, धरमसिंग चव्हाण, रवींद्रसिंघ मोदी, आर. डी. सिंघ, डॉ. परवीदर कौर कोल्हापुरे यांच्यासह विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २० वर्षीय तरुणीच्या मृत्यूप्रकरणी लोहा पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद

**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा शहरात २० वर्षीय तरुणीचा मृत्यू झाल्याप्रकरणी लोहा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

दि. २१ मार्च रोजी दुपारी २ ते ६ दरम्यान लोहा शहरातील शिवाजी चौकातील कानोडे कॉम्प्लेक्स येथे धनश्री रमेश तेलंग (२०) ही तरुणी राहत्या घरी बेहोश पडली असता तिला लोहा येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तिची तपासणी करून तिला मयत घोषीत केले.

याबाबत मयत धनश्रीची आई संगिता रमेश तेलंग रा.गऊळ ता.कंधार ह.मु. लोहा शिवाजी चौक कानोडे कॉम्प्लेक्स यांनी लोहा पोलिसांत सदरील फिर्याद दिली असता लोहा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू क्रमांक ९/२०२५ कलम १९४ बीएनएस नुसार नोंद करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. पुढील तपास एपीआय केदार हे करीत आहेत.

# चांदेरी



# चित्रपट चांगला आहे की वाईट यावर फोकस करा

## अभिषेक बच्चनची विशेष मुलाखत

**अभिषेक बच्चन जवळजवळ २५ वर्षांपासून बॉलीवूड इंडस्ट्रीत आहे. गेल्या काही काळापासून तो त्याच्या भूमिकांमध्ये सतत प्रयोग करत आहे. बिग बुल आणि ब्रीद २ मधील त्याच्या कामाचे कौतुक झाले असले तरी, बॉब बिस्वास, दसवी, घूमर आणि आय वॉन्ट टू टॉकमध्ये त्याच्या पात्रांच्या वेगवेगळ्या छटा दिसून आल्या. सध्या तो ओटीटीवर प्रदर्शित होणाऱ्या त्याच्या बी हॅपी चित्रपटामुळे चर्चेत आहे. त्याच्याशी केलेली खास बातचीत... प्रश्नोत्तराच्या स्वरुपात...**

> "मी अमिताभ बच्चन यांचा सर्वांत मोठा चाहता... ते माझे हिरो आहेत...

**प्रश्न : आय वॉन्ट टू टॉक या तुझ्या शेवटच्या चित्रपटानंतर, बी हॅपी चित्रपटातही तू वडिलांची भूमिका साकारत आहेस. खऱ्या आयुष्यात आराध्याचे वडील होण्याचा तुला किती फायदा झाला?**

अभिषेक : शेवटी, आपण सर्व कलाकार आहोत. आमचे काम अभिनय करणे आहे. मी पोलीस अधिकारी, राजकारणी, चोर, कॉन्ट्रॅक्ट किलर अशा अनेक भूमिका केल्या आहेत. पण मी यापैकी काहीही नाही, म्हणून मला असे म्हणायचे आहे की आपल्याला त्या पात्रांमध्ये उतरावे लागेल, पण हो, खऱ्या आयुष्यात मी एक वडील आहे, म्हणून मी वडिलांची ती भावना समजू शकतो. ती भूमिका साकारणे सोपे होते, पण नंतर चित्रपटातील आणि प्रत्यक्ष जीवनातील परिस्थिती वेगळी असते.

**प्रश्न : साधारणपणे आपल्याला दोन प्रकारचे पालक दिसतात, एक जे आपल्या मुलांना त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यास भाग पाडतात आणि दुसरे, जे आपल्या मुलांची स्वप्ने पूर्ण करतात. पालकत्वाबद्दल तुमचे काय मत आहे?**

अभिषेक : माझ्या आईवडिलांनी कधीही माझ्यावर काहीही करण्यासाठी कोणत्याही प्रकारचा दबाव आणला नाही. त्यांनी कधीही असे म्हटले नाही की तू मोठे झाल्यावर अभिनेता किंवा आयएएस व्हावे. त्यांचा भर नेहमीच दोन गोष्टींवर असायचा: एक चांगला माणूस बना आणि आनंदी राहा. तुम्ही जे काही कराल ते मनापासून करा आणि आनंदी रहा. पालक म्हणून मी माझ्या आयुष्यात हे तत्वज्ञान स्वीकारले आहे.

**प्रश्न : शतकातील मेगास्टार म्हणून ओळखले जाणारे तुझे वडील अमिताभ बच्चन नेहमीच तुझ्यासाठी चीअरलीडर राहिले आहेत. ते इंडस्ट्रीतील इतर कलाकारांनाही प्रोत्साहन देत असतात. त्यांची प्रतिक्रिया तुला किती महत्त्वाची वाटते?**

अभिषेक : शतकातील ते सुपरस्टार आहेत आणि मी त्यांचा सर्वात मोठा चाहता आहे. ते माझे हिरो आहेत. जेव्हा तुमचा हिरो तुमची प्रशंसा करतो तेव्हा सुखावणे स्वाभाविक आहे. त्यांनी खूप काही केले आहे आणि पाहिले आहे आणि तरीही, जर ते तुमच्या कामाबद्दल तुम्हाला काही चांगले सांगत असतील तर तुम्हाला नक्कीच आनंद होईल. ते हे फक्त माझ्या कामासाठीच करत नाहीत, तर इंडस्ट्रीतील इतर लोकांसाठीही करतात. त्यामुळे खूप छान वाटतं.

**प्रश्न : साधारणपणे कलाकारांना भूमिकांच्या बाबतीत सुरक्षित चित्रपट करायचा असतो, तर बॉब बिस्वास, दासवी, घूमर आणि आय वॉन्ट टू टॉक सारखे ऑफबीट चित्रपट सतत करण्याचे धाडस तुम्ही कसे केले?**

अभिषेक : खरं सांगायचं तर, मला हे सर्व चित्रपट सुरक्षित वाटतात. सुरक्षित चित्रपट म्हणजे तुमच्या हृदयाला स्पर्श करणारा. या सर्व कथा माझ्या हृदयाला स्पर्शून गेल्या आहेत. जर एखादा कलाकार त्याच्या मनाचे ऐकत नसेल तर तो लवकरच त्याच्या कामापासून दूर जाईल. आम्ही कलाकार भावनिक काम करतो. जर तुम्ही चित्रपट पाहायला गेलात तर तुम्हाला विचारले जाते की तुम्हाला तो चित्रपट आवडला की वाईट? काम अशा प्रकारे निवडले पाहिजे, ती कथा तुम्हाला भावली का आणि तुम्हाला तो चित्रपट पहायला आवडेल का? जर दोन्हीची उत्तरे हो असतील तर तुम्ही तो चित्रपट करायला हवा.

**प्रश्न : काही काळापूर्वी तू शुक्रवारच्या दबावाबद्दल बोलत होता. तुझे याआधीचे अनेक चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित झाले आहेत, मग तुला वाटते का की ही काही दिलासा देणारी बाब आहे?**


अभिषेक : ओटीटीवर, फक्त शुक्रवारचा ताण नसतो. कारण सिनेमात तुम्हाला दर शुक्रवारचा संग्रह कळतो, पण इथे संपूर्ण आठवडा तणावाने भरलेला असतो. आपण नेहमीच संग्रहांबद्दल बोलतो, पण संग्रह आपल्याला शेवटी काय सांगतात? म्हणजेच, लोकांना चित्रपट आवडला की नाही? जर लोकांना चित्रपट आवडला तर त्याचे कलेक्शन मोठे असेल आणि जर त्यांना नाही आवडला तर त्याचे कलेक्शन कमी असेल. ओटीटीवर दुसरे कोणतेही खाते नाही, फक्त हे एक आहे. जर त्यांना चित्रपट आवडला तर ते सबस्क्रिप्शन रिन्यू करतील, जर त्यांना चित्रपट पाहण्यासारखा वाटला नाही तर ते तो पाहणार नाहीत आणि मग ओटीटी तुम्हाला पुढील चित्रपटासाठी प्लॅटफॉर्म देणार नाही. पॅरामीटर समान आहे. दबाव कधीच कमी होत नाही.

**प्रश्न : छावाचा अपवाद सोडला तर सध्या चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी करत नाहीत. याबद्दल तुला काय म्हणायचे आहे?**

अभिषेक : मी तुमच्याशी सहमत नाही. गेल्या १२ महिन्यांत, निश्चितच असे ३-४ चित्रपट आले आहेत ज्यांनी ५०० कोटी रुपये कमावले आहेत. बघा, जेव्हा चित्रपट येतील तेव्हा त्यातील काही हिट होतील आणि काही होणार नाहीत. हे शतकानुशतके चालू आहे आणि आपल्याला आपले काम करावे लागेल. मला एक गोष्ट आवडत नाही ती म्हणजे आजकाल प्रेक्षकांना कलेक्शन जाणून घेण्यात जास्त रस आहे. आम्ही लहान असताना अमर अकबर अँथनीचे कलेक्शन किती आहे हे कधीच विचारले नाही? आम्ही विचारायचो, चित्रपट हिट होतो की फ्लॉप? ते चांगले आहे की वाईट? मला वाटतं लक्ष तिकडे परतायला हवं. आम्ही सोशल मीडियावर देखील पोस्ट करतो की आम्ही इतके पैसे गोळा केले आहेत. बघा, कलेक्शन हा उद्योगाचा विषय आहे, चर्चा चित्रपट चांगला आहे की नाही यावर व्हायला हवी. व्यवसायाशी तुमचा काय संबंध? तुम्हाला फक्त बघायचे आहे की तुम्हाला चित्रपट आवडला की नाही?

**प्रश्न : आज, इंटरनेटच्या युगात, तुला वाटत नाही का की प्रत्येकाकडे खूप जास्त माहिती आहे? सोशल मीडियाच्या युगाकडे तू कसे पाहतो?**

अभिषेक : मी सोशल मीडियावर जास्त नसतो. आजकाल सोशल मीडिया एक ट्रेंड बनला आहे, पण मला त्यावर विश्वास नाही. एक अभिनेता म्हणून मी असे म्हणू शकतो की शेवटी, तुम्ही मोठ्या पडद्यावर काय करता हे महत्त्वाचे आहे. तुम्ही दहा हजार सेल्फी पोस्ट केले तरी काहीही होणार नाही. लोक तुमचा चित्रपट पाहण्यासाठी येणार नाहीत.



**प्रश्न : तुझ्या चित्रपटाचे नाव बी हॅपी आहे, तुझ्यासाठी आनंदाची व्याख्या काय आहे?**

अभिषेक : मला माझ्या कामातून खूप आनंद मिळतो. जेव्हा मी कॅमेऱ्यासमोर असतो तेव्हा मला खूप आनंद होतो. त्याचप्रमाणे, जेव्हा मी माझ्या कुटुंबासोबत असतो तेव्हा मला एक वेगळाच आनंद मिळतो.

**प्रश्न : या रि-रिलीजच्या काळात, तुमचे कोणते चित्रपट तुम्हाला पुन्हा रिलीज करायला आवडतील?**

अभिषेक : मला 'कभी अलविदा ना कहना' पुन्हा प्रदर्शित करायचा आहे कारण जेव्हा तो चित्रपट २००६ मध्ये प्रदर्शित झाला तेव्हा मला वाटते की करण (करण जोहर) चा चित्रपट त्याच्या काळाच्या खूप पुढे होता. आजच्या पिढीला हा चित्रपट समजेल. दुसरा चित्रपट मी म्हणेन 'दिल्ली ६', जो मला पुन्हा प्रदर्शित झालेला पाहायला आवडेल.

# आधी घरातील महिला, मुलींना आदराने वागवा : अदा शर्मा

**अदा शर्मा ही अशा अभिनेत्रींपैकी एक आहे जिला प्रसिद्धीत कसे राहायचे हे माहीत आहे. केरळ स्टोरी असो किंवा बस्तर सारखे चित्रपट असोत किंवा सोशल मीडियावरील तिच्या विचित्र पोस्ट असोत, ती नेहमीच चर्चेत असते. सध्या ती आयव्हीएफ तज्ज्ञ डॉ. अजय मुरिया यांच्या आयुष्यातील आधारित चित्रपट तुमको मेरी कसममुळे चर्चेत आहे. या निमित्ताने तिची भेट घेऊन वेगवेगळ्या विषयांवर चर्चा केली असता, ती मनमोकळेपणाने बोलली. प्रश्नोत्तराच्या स्वरुपातील ही मुलाखत...**

**प्रश्न : अलीकडेच महिला दिनानिमित्त, तू तुझ्या घरकाम करणाऱ्या काकूंना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. महिला म्हणून तुला त्रासदायक वाटेल अशी कोणती गोष्ट आहे?**

अदा : जेव्हा महिलांवर प्रत्येक मुद्द्यावर दबाव येतो तेव्हा मला खूप वाईट वाटते. आपण म्हणतो की महिलांना समान हक्क मिळाले पाहिजेत, पण ते होत नाही किंवा अचानक होणारही नाही. तुम्हाला तुमच्या मुलांना लहानपणापासूनच हीच सवय लावावी लागेल. जेवायला बसताना घरातील मुलांनाही ताटे करायला, लावायला सांगितली पाहिजे. त्यांना घरकामात सहभागी करून घेतले पाहिजे. आधी घरातील महिलांना समानता किंवा आदराने वागवावे लागेल.

**प्रश्न : महिलांना सामान्यतः सुपरवुमन म्हणतात, तुझ्यासाठी सुपरवुमन कोण आहे?**

अदा : माझ्या दृष्टीने, गृहिणी ही एक सुपरवुमन असते. नवरा फक्त ऑफिसला जातो आणि घरी येतो, पण गृहिणी आठवड्याचे सातही दिवस २४ तास काम करते. तिला आठवड्याच्या शेवटी एकही दिवस सुट्टी मिळत नाही. इच्छा असूनही रजा मिळत नाही. मला वाटतं की समाजाने तिला घराची राणी मानलं पाहिजे. मी गृहिणींबद्दल माझे विचार खूप उच्च ठेवते आणि आशा करते की लोकही असेच उच्च विचार करतील. जे असे विचार करत नाहीत त्यांनीही असे विचार करायला सुरुवात करावी. मी माझ्या आई आणि आजीला सुपरवुमन मानते. त्या परिपूर्ण गृहिणी आहेत. माझी आई कुशलतेने घर सांभाळते. तिने अनेक त्याग केले आहेत. मी शाळेत असताना, ती माझ्या अभ्यासापासून ते घरातील कामांपर्यंत सर्व काही सांभाळायची. आज जेव्हा मी चित्रपटांच्या शूटिंगसाठी जाते. तेव्हा घरातील सर्व कामे करण्यासोबतच मला प्रोत्साहितही करते.

**प्रश्न : अदा, इन्स्टाग्रामवर तुझे ९.७ दशलक्षाहून अधिक चाहते आहेत, सोशल मीडियावर तुला खूप प्रेम मिळते, पण तुला नाही वाटत का की, तू प्रमाणापेक्षा जास्त स्वतःला तिथे मांडत असते?**

अदा : नाही, मला तसं वाटत नाही. मी ते एक व्यासपीठ मानते. जिथे मी माझ्या चाहत्यांशी थेट संपर्क साधू शकते. मी सतत अनाठायी व्हिडिओ काढत राहते आणि पोस्ट करत राहते. मी जशी आहे तसे मला स्वीकारल्याबद्दल मी माझ्या चाहत्यांची आभारी आहे. मला त्यांच्यासमोर कृत्रिम असण्याची गरज नाही. मी प्राणीप्रेमी आहे, म्हणून मी हत्ती, कुत्रे, मांजरी इत्यादींचे व्हिडीओ पोस्ट करत राहते. मी सोशल मीडियावर फिल्टर घेऊन येत नाही. जर माझे केस विमानतळावर विस्कटले असतील किंवा माझे काळे वर्तुळ असतील तर मी ते लपवत नाही. लोकांना हे देखील कळले पाहिजे की आपणदेखील माणसे आहोत आणि मेकअपशिवाय आपण कसे दिसू शकतो. तुम्ही तुमच्या सोशल मीडियावर जितके खरे असाल तितके चांगले, नाहीतर तुम्ही कधी ना कधी पकडले जाल.

**प्रश्न : आजकाल एक-दोन चित्रपटांव्यतिरिक्त, दुसरा कोणताही चित्रपट बॉक्स ऑफिसवर चमत्कार करू शकत नाही? बॉक्स ऑफिसचा अंदाज कोणीही लावू शकत नाही. कारण?**

अदा : आता बघा, जेव्हा दोन लोक, जे एकमेकांपासून खूप वेगळे आहेत ते प्रेमात पडतात, पण तेच दोन लोक इतर दोन लोकांवर प्रेम करू शकत नाहीत. तुम्ही असा चित्रपट बनवता जो लोकांना खूप आवडतो, पण जर तुम्ही असाच चित्रपट बनवलात तर लोकांना तो आवडणार नाही. त्यामुळे विषयात नाविण्य असणं खूप गरजेचे आहे. त्याच त्या पठडीतले चित्रपट पाहून लोक कंटाळले आहेत. त्यांना काहीतरी नवं हवं आहे. नवनवीन विषय शोधणं, ते दमदारपणे सादर करणे खूप गरजेचे झाले आहे.

**प्रश्न : जवळजवळ १७ वर्षांपूर्वी, तू विक्रम भट्ट यांच्या १९२० या चित्रपटातून बॉलीवूड कारकिर्दीला सुरुवात केली होती. आता तू पुन्हा त्यांच्यासोबत नवीन चित्रपटात काम करत आहे. दिग्दर्शक आणि अभिनेता म्हणून तुम्ही दोघे किती विकसित झाला आहात?**

अदा : हॉरर चित्रपटांमध्ये पूर्वी कामुक दृश्ये असायची, पण २००८ मध्ये विक्रम भट्ट यांनी एका प्रेमकथेसह १९२० हा भयपट आणला. तो माझा पहिला चित्रपट होता. मी खूप भाग्यवान आहे की चित्रपट यशस्वी झाला आणि आता मी विक्रम भट्टसोबत तुमको मेरी कसममध्ये आहे. विक्रम भट्ट कोणतेही काम आनंदाने पूर्ण करतात. ते खूप मजेदार व्यक्ती आहेत. त्यांच्या उपस्थितीत सेटवरील वातावरण नेहमीच सकारात्मक असते. मी नेहमीच त्यांच्या सेटवर जाण्यासाठी उत्सुक असते. माझा नवा चित्रपट पुरुषत्वाच्या आणि महिलांच्या प्रजनन क्षमतेच्या मुद्द्यावर भाष्य करतो. जगभरातील महिलांना भेडसावणारे हे प्रश्न आहेत. हा चित्रपट सर्वात मोठी आयव्हीएफ चेन चालवणारे डॉ. अजय मुरिया यांच्या सत्यकथेवर आधारित असला तरी त्यातील सर्व महिला पात्रे खूप मजबूत आहेत. माझे पात्र खूप मजबूत आहे.



# आलिया-रणबीर करताहेत दुसऱ्या बाळाचं प्लॅनिंग?

बॉलीवूडमधील काही लोकप्रिय कपलच्या यादीत येणारं अग्रगण्य नाव म्हणजे अभिनेता रणबीर कपूर आणि अभिनेत्री आलिया भट्ट. २०२२ मध्ये आलिया रणबीरबरोबर लग्नबंधनात अडकली. त्यानंतर त्याच वर्षी नोव्हेंबर महिन्यात तिने राहाला जन्म दिला. २०२३ साली आलिया व रणबीर यांनी ख्रिसमसच्या निमित्ताने पहिल्यांदाच लेकीला माध्यमांसमोर आणले. रणबीर व त्याच्या लेकीचे एकमेकांवर जीवापाड प्रेम आहे आणि हे वेळोवेळी दिसूनही आले आहे. रणबीर व लेक राहाचे अनेक फोटो-व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असतात. अशातच आता रणबीर-आलिया त्यांच्या पहिल्या लेकीनंतर दुसऱ्या अपत्याचा विचार करत असल्याच्या चर्चा होताना दिसत आहेत. रणबीर-आलिया यांनी स्पष्टपणे याबद्दल खुलासा केला नसला तरी नुकत्याच एका मुलाखतीत रणबीरने यविषयी नकळत वक्तव्य केल्याचे पाहायला मिळाले. रणबीरने त्याच्याबद्दल गूगलवर सर्वाधिक सर्च केलेल्या



प्रश्नांची उत्तरे दिली. त्यात एक प्रश्न असा होता, तो लवकरच नवीन टॅटू काढणार आहे का? त्यावर रणबीरने उत्तर दिले, अजून तरी नाही. म्हणजे मला माहीत नाही. आशा आहे की, लवकरच. काहीतरी असेल. कदाचित माझ्या मुलांचीही नावं असतील. माहीत नाही. रणबीरने या प्रश्नाचे उत्तर देताना 'मुलांचा' असा उल्लेख त्याने केल्याने तो दुसऱ्या अपत्याचा विचार करीत असल्याचे म्हटले जात आहे.

# 'सिकंदर'चा ग्रँड ट्रेलर लॉन्च सोहळा रद्द

सलमान खान व रश्मिका मंदाना यांच्या 'सिकंदर' चित्रपटाची सध्या प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. अवघ्या काही दिवसांत हा बहुचर्चित, बहुप्रतीक्षित चित्रपट प्रदर्शित होणार आहे. 'सिकंदर' चित्रपटाची नुकतीच प्रदर्शनाची तारीख जाहीर करण्यात आली. ईदचं औचित्य साधून ३० मार्चला भाईजानचा यंदाच्या वर्षातला पहिला चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. आतापर्यंत 'सिकंदर' चित्रपटाचे दोन टीझर, गाणी प्रदर्शित झाली आहेत. त्यामुळे प्रेक्षक ट्रेलरची वाट पाहत आहेत. अशातच 'सिकंदर' चित्रपटाचा ग्रँड ट्रेलर लॉन्च सोहळा रद्द केल्याचं समोर आलं आहे. सलमान खानच्या सुरक्षेची काळजी घेऊन 'सिकंदर' चित्रपटाचा ट्रेलर लॉन्च सोहळा रद्द केला आहे. गेल्या काही महिन्यांपासून सलमानला येणारे धमक्यांचे फोन आणि काही घटनांचा विचार करून हा निर्णय घेतला आहे. एप्रिल २०२४ मध्ये सलमान खानच्या गॅलेक्सी अपार्टमेंटवर गोळीबार करण्यात आला होता. त्यानंतर त्याला धमकीचे फोन आले होते. त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव 'सिकंदर' चित्रपटाचा ट्रेलर लॉन्च सोहळा रद्द केला आहे. माहितीनुसार, 'सिकंदर' चित्रपटाचा ट्रेलर २२, २३ किंवा २४ मार्चला प्रदर्शित केला जाऊ शकतो. ज्याप्रमाणे युट्यूबवर चित्रपटाचे टीझर, गाणी प्रदर्शित झाली त्याप्रमाणे ट्रेलर प्रदर्शित होणार आहे. ट्रेलर प्रदर्शनाची घोषणा निर्मात्यांकडून एक दिवस आधी केली जाणार आहे. ट्रेलर लॉन्च झाल्यानंतर भारतात चित्रपटाच्या अॅडवान्स बुकिंगला सुरुवात होणार आहे. परदेशात 'सिकंदर' चित्रपटाची अॅडवान्स बुकिंग २४ फेब्रुवारीपासून सुरू झाली आहे. दरम्यान, 'सिकंदर' चित्रपटाच्या दिग्दर्शन ए.आर.मुरुगदॉस यांनी केलं आहे. या चित्रपटात सलमान खान, रश्मिका मंदाना व्यतिरिक्त काजल अग्रवाल, शर्मन जोशी, प्रतीक बब्बर झळकणार आहे. तसंच 'बाहुबली 'चित्रपटातील कटप्पा म्हणजे अभिनेता सत्यराज खलनायिकाच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे.

# जिल्हा रुग्णालयाच्या उभारणीसाठी ३७२ कोटींचा निधी मंजूर करा – आ. बोंढारकर यांची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– मराठवाड्यातील अत्यंत झपाट्याने वाढणारे शहर आणि जिल्हा म्हणून नांदेडची ओळख आहे. त्यामुळे येथे रुग्ण संख्येतही मोठी वाढ होत आहे. ही बाब लक्षात घेता नांदेड येथे असलेल्या गुरुगोविंद सिंगजी स्मारक आणि रुग्णालयाच्या उभारणीसाठी राज्य सरकारने ३७२ कोटी रुपये रुपयांची तरतूद करावी आणि तातडीने मंजूर करून रुग्णालयाच्या पुनरुभारणीचे काम तातडीने सुरू करावे अशी मागणी नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव



पाटील तिडके बोंढारकर यांनी विधानसभेत केली आहे.

नांदेड दक्षिण मतदार संघात विष्णुपुरी येथे डॉक्टर शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय सुरू करण्यात आले. तत्पूर्वी शहरात श्री गुरुगोविंद सिंगजी स्मारक व रुग्णालय कार्यरत होते. या रुग्णालयात नांदेडसह निजामबाद, लातूर, परभणी, हिंगोली, म्हैसा, मुधोळ आदी भागातील रुग्ण उपचारासाठी येत असत परंतु नूतन रुग्णालयाची वास्तू विष्णुपुरी भागात उभारण्यात आल्यानंतर त्या ठिकाणी रुग्णांची संख्या भरमसाठ वाढली आहे. शिवाय शहरातील जिल्हा रुग्णालयाची इमारत मोडकळीस आली आहे. अशा परिस्थितीत येथे तीनशे खाटांच्या अंतररुग्ण विभागाच्या इमारत बांधकामासाठी १३८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. परंतु हे काम सध्या थांबलेले आहे. सध्या मंजूर असलेल्या ३०० खाटांची संख्या वाढून ती ५०० खटापर्यंत न्यावी आणि ५०० खाटांचे श्रेणी वर्धन करून जिल्हा रुग्णालय इमारत बांधकामासाठी ३७२ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करावी. थांबलेले काम तरी सुरू करावे आणि नांदेड जिल्ह्यासह परिसरातील अन्य जिल्ह्यातील रुग्णांनाही अद्यावत अशी सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी आ.बोंढारकर यांनी केली आहे.



**नांदेड** –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांचे कार्यक्रमांतर्गत नांदेड सार्वजनिक बांधकाम विभाग येथे कार्यकारी अभियंता रामचंद्र गलधर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहिम राबवण्यात आली. या मोहिमेत उपअभियंता (उत्तर) संतोष नाईक, उप अभियंता (दक्षिण) शिवाजी नरमिटवार, कनिष्ठ अभियंते अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. (छाया- करणसिंह बैस)

## २५ मार्चपर्यंत ई-केवायसी करण्याचे आवाहन

**लातूर(प्रतिनिधी)** – खरीप हंगाम २०२४ मध्ये माहे जून ते आक्टोबर २०२४ या कालावधीत लातूर जिल्हयात अतिवृष्टीने झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीपोटी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासनाकडून ४६६ कोटी ४० लाख इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. हा निधी वाटपाची कार्यवाही डीबीटी प्रणालीमार्फत सुरु आहे. आजपर्यंत जिल्ह्यातील ३ लाख ८६ हजार ५०५ लाभार्थी मदतीसाठी पात्र ठरविण्यात आले असून त्यापैकी ३ लाख ५० हजार ३७३ लाभार्थ्यांना ३८७ कोटी ३४ लाख रुपये निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच २४ हजार ३८२ शेतकऱ्यांनी अद्याप ई-केवायसी न केल्याने रक्कम २१ कोटी ७७ लाख रुपये इतका निधी वितरीत करणे शिल्लक आहे.






# मच्छीमाराचा मन्याड नदीपात्रात बुडून मृत्यू

### कंधार तालुक्यातील धर्मापुरी येथील घटना

**नांदेड (प्रतिनिधी)**– मासेमारी करण्यासाठी मन्याड नदीपात्रात गेलेल्या एका मच्छीमाराचा वादळी वाऱ्यामुळे होडी हेलकावून त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. ही घटना २१ मार्च रोजी सकाळी उघडकीस आली.

कंधार तालुक्यातील धर्मापुरी येथील मासेमारी करणारा नामदेव निवृत्ती डुबुकवाड (वय ३६) हा २० मार्चच्या दुपारी तीनच्या दरम्यान मासेमारी करण्यासाठी मन्याड नदीपात्रात आपल्या होडीसह उतरला. परंतु अचानक वादळी वारे आल्याने पाण्याच्या लाटा तयार होऊन त्याच्या होडीचा अपघात झाला आणि यात बुडून त्याचा मृत्यू झाला. ही माहिती २१ मार्च रोजी सकाळी त्याच्या घरच्या मंडळींना समजली. त्यानंतर धर्मापुरी येथील नागरिकांनी मन्याड नदीकडे धाव घेतली. पोलिसांनाही ही माहिती देण्यात आली. कंधार पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला व पाण्यावर तरंगणारा मृतदेह बाहेर काढून कंधारच्या सरकारी रुग्णालयात दाखल केला. शवविच्छेदनानंतर नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला. विठ्ठल निवृत्ती डुबकवाड यांच्या माहितीवरून कंधार पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तपास पोलीस हवालदार सानप करत आहेत.

# महाबोधी महाविहारमुक्ती आंदोलन महामोर्चाची तयारी अंतिम टप्प्यात

**नांदेड (प्रतिनिधी)**– बिहार राज्यातील बुद्धगया महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे या मागणीच्या आंदोलनाने देशभर जोर धरला आहे. नांदेड येथे २५ मार्च रोजी भव्य मुक्ती आंदोलन महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील बौद्ध अनुयायी लाखोंच्या संख्येने या महामोर्चात सहभागी होणार आहेत. शुभ्र वस्त्र परिधान केलेले मोर्चेकरी शिस्त आणि शांततेने महामोर्चात सामील होऊन मोर्चा यशस्वी करतील, अशी माहिती महामोर्चाचे संयोजक बौद्ध भिक्खू समितीने आज पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला महामोर्चा आयोजक बौद्ध भिक्खू संघ, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल तसेच विविध राजकीय पक्षांचे नेते, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



महामोर्चाच्या आयोजनाबाबत भूमिका विषद करताना भिक्खू संघातर्फे बिहार राज्यातील बुद्धगया महाबोधी महाविहार बौद्ध धर्मियांचे पवित्र स्थळ असल्याचे सांगण्यात आले. महाबोधी महाविहार हे जगाला शांतीचा संदेश आणि समतेचा उपदेश देणाऱ्या तथागत भगवान बुद्धाच्या ज्ञानप्राप्तीचे पवित्र ठिकाण आहे.

भारतीयच नव्हे तर जगाच्या पाठीवर असणाऱ्या समस्त बौद्ध अनुयायींसाठी महाबोधी महाविहार हे श्रद्धेचे स्थळ आहे. भारतातच नाही तर इतर सर्वच देशांमध्ये कोणत्याही धर्माचे श्रद्धा स्थळ असो तेथे त्या त्या धर्मीयांचा ताबा असल्याचे आढळून येतो. त्या त्या धर्माच्या अनुसार तेथे पूजाअर्चा, साधना, ध्यानधारणा केली जाते. परंतु महाबोधी महाविहार येथे हिंदू धर्मीयांचा ताबा असल्याने तेथे कर्मकांड केले जात आहेत. त्यामुळे भगवान बुद्धांच्या विचारांना हरताळ फासण्यात येत आहे. या संदर्भातील टेम्पल ॲक्ट १९४९ तात्काळ रद्द करून महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यासाठी नांदेड येथील महामोर्चाचे आयोजन करण्यात आल्याचे यावेळी पत्रकार परिषदेत स्पष्ट करण्यात आले.

नांदेड येथे २५ मार्च रोजी दुपारी १२ वाजता नवा मोठा मैदान येथे बौद्ध अनुयायी महामोर्चासाठी जमा होणार आहेत. महात्मा फुले पुतळा मार्गे शिवाजीनगर, वजिराबाद चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या मार्गाने महामोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. शुभ्र वस्त्र परिधान केलेले अनुयायी शिस्तबद्ध पद्धतीने मोर्चात सहभागी होतील. मोर्चाची व्यापकता लक्षात घेता उपासक उपासिकांनी शांततेने मोर्चामध्ये सहभागी होण्याचे आवाहनही यावेळी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून संयोजकांनी केले आहे.


## कागदपत्र हरवली

माझी चैतन्य भागवतराव पावडे या नावाचे सर्व कागदपत्रे व बि.एड.ची मुळ टि.सी. मुखेड ते नांदेड प्रवासात हरवले आहे. कोनास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

:-संपर्क पत्ता:-
चैतन्य भागवतराव पावडे
रा. मुखेड ता. मुखेड जि. नांदेड
मो. ९४२३७६०६६२

## कागदपत्र हरवली

माझी रितेश संग्राम एकाळे रा. होटाळा या. नायगाव जि.नांदेड या नावाची १० वी व १२ वी (विज्ञान) पासची टि.सी. मार्क मेमो, सनद,व ईतर कागजपत्र नरसी ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क करावा.

संपर्क पत्ता –
रितेश संग्राम एकाळे
रा.होटाळा ता.नायगाव जि.नांदेड मो ९९२३७७२८८२

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

## CONSULTING PHYSIOTHERAPIST
## कन्सल्टिंग फिजिओथेरपीस्ट

डॉ.ईश्वर जी. हिंगोलीकर (PT) (B.P. Th)

उपलब्ध सुविधा
- कपिंग थेरपी (गोल्ड मेडलिस्ट)
- ड्राय नीडलींग थेरपीस्ट
- ऑर्थोपेडिक रिहॅबिलिटेशन
- टेपींग थेरपीस्ट
- न्यूरो रिहॅबिलिटेशन

नांदेड
होम व्हिजीट उपलब्ध 9657631231

ऑफर ऑफर A/C ऑफर
## महाराष्ट्र जेन्टस् ब्युटी सलुन

**फेशियल**
१) गोल्ड फेशियल 499/-
२) VLCC फेशियल 499/-
३) डायमंड फेशियल 599/-

**डी-टॅन**
१) O3+ 349/-
२) रागा 299/

**ब्लीच**
१) ऑक्सी ब्लीच 299/-
२) ओलिविया ब्लीच 299/-

**कलर**
१) लोरियल 299/-
२) मॅट्रिक्स 299/-
३) रागा 249/-
४) गार्नियर 199/-

**हेयर स्पा**
१) लोरियल 249/-
२) मॅट्रिक्स 249/-

हॉटेल मंजू समोर, वजिराबाद, नांदेड. 9822972221


## जाहीर प्रगटन
## मुक्ता साळवे मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था म.भोकर ता.भोकर जि.नांदेड

मुक्ता साळवे मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था म.भोकर ता.भोकर जि.नांदेड या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक सन २०२५-२२३० साठीची प्रारूप मतदान यादी संस्थेचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेली आहे.

सदर मतदान यादीवर संस्थेच्या सभासदांपैकी कुणाचा आक्षेप असल्यास दिनांक १९/०३/२०२५ ते २८/०३/२०२५ पर्यंत संस्थेचे अध्यक्ष/सचिव व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरूपात आक्षेप नोंदवावेत. कृपया सदर तारखेनंतर आलेले आक्षेपाचा विचार केला जाणार नाही याची सभासदांनी नोंद घ्यावी.

संतोष के.सरकटे
निवडणूक निर्णय अधिकारी
मुक्ता साळवे मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था
म.भोकर मो.९७६७१००५५८

अध्यक्ष/ सचिव
मुक्ता साळवे मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था
म.भोकर मो.९२८४६६४४८५

## जाहीर प्रगटन
## नागसेन मागासवर्गीय गृहनिर्माण सह.संस्था म.भोकर ता.भोकर जि.नांदेड

नागसेन मागासवर्गीय गृहनिर्माण सह.संस्था म.भोकर ता.भोकर जि.नांदेड या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक सन २०२५-२२३० साठीची प्रारूप मतदान यादी संस्थेचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व दंडे यांच्या घराच्या भिंतीवर लावण्यात आलेली आहे.

सदर मतदान यादीवर संस्थेच्या सभासदांपैकी कुणाचा आक्षेप असल्यास दिनांक १९/०३/२०२५ ते २८/०३/२०२५ पर्यंत संस्थेचे अध्यक्ष/सचिव व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरूपात आक्षेप नोंदवावेत. कृपया सदर तारखेनंतर आलेले आक्षेपाचा विचार केला जाणार नाही याची सभासदांनी नोंद घ्यावी.

संतोष के.सरकटे
निवडणूक निर्णय अधिकारी
नागसेन मागासवर्गीय गृहनिर्माण सह.संस्था म.भोकर ता.भोकर
जि.नांदेड मो.९७६७१००५५८

अध्यक्ष/ सचिव
नागसेन मागासवर्गीय गृहनिर्माण सह.संस्था म.भोकर ता.भोकर
जि.नांदेड मो.७६६६४३६३६५

## Change In Name

My old name is RAMESH RAMKRISHNJI SARDA which now I am changing as new name RAMESHCHANDRA RAMKISHAN SARDA henceforthmyallcorrespondence will be done as per my new name please consider the same Add: VISAWA NAGAR ITI NANDED MAHARSHTRA 431602 MO.9423410780

## Change In Name

My Old Name is: MAHERUNNISSA BEGUM Which now I am. Changing as New Name : MEHRUNNISA BEGUM ABDUL SAMI Hence, forth my all correspondence. Will be done as per my New Name. Please consider, the same.Address 9-7-1316, Devi Nagar Degloor Naka, Nanded Mob.7276778357




# गोदातीर समाचार






## रसायनयुक्त पाणी लोकवस्तीमध्ये सोडल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात



**नांदेड (प्रतिनिधी)**–सिडको, नवीन नांदेड परिसरालगत असलेल्या एमआयडीसी भागातील श्रीनिवासा कॅटल फुड्स प्रायव्हेट लिमिटेड या कारखान्यातील वापरलेले रसायनयुक्त पाणी वसरणी परिसरातील लोकवस्तीमध्ये खुलेआम सोडले जात असल्याने ज्येष्ठ नागरिकांसह लहान मुलांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. तसेच या अनुषंगाने रितसर तक्रार केल्यानंतरही महापालिका आणि प्रदूषण नियंत्रक मंडळाच्या उपप्रादेशिक अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष केले जात असल्याबद्दल स्थानिक ग्रामस्थांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

सिडको परिसरा लगत असलेल्या एमआयडीसी परिसरातील श्रीनिवासा कॅटल फुड्स प्रायव्हेट लिमिटेड या कारखान्यातील वापरलेले रसायनयुक्त पाणी रमामाता आंबेडकर चौक ते दूध डेअरीकडे जाणाऱ्या रस्त्याला क्रॉस करून परिसरातील नागरी वस्तीमध्ये मागील काही वर्षांपासून अगदी खुलेआम सोडले जात आहे. त्यामुळे वसरणी शिवारातील गोदावरी हातमाग सोसायटी गट २६.४७ ४८. २५/१ व्यंकटी नगर, माता रमाई नगर सर्वे नंबर २७ आणि आंबेडकरवादी मिशन या भागातील नागरिक अक्षरशः त्रस्त झाले आहेत. ज्येष्ठ नागरिकांसह लहान बालकांना विविध आजारांचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे त्रासून गेलेल्या या भागातील रहिवासी नागरिकांनी प्रदूषण नियंत्रक मंडळ आणि महापालिका प्रशासनाकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत. परंतु संबंधित प्रशासनाचे या गंभीर सम स्येकडे सोयीस्कर दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

प्रदूषण नियंत्रक मंडळाचे उपप्रादेशिक अधिकाऱ्यांकडून संबंधित कंपनीच्या व्यवस्थापनाला केवळ एक लेखी पत्र देण्याशिवाय कुठलीच कारवाई केली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या या भागातील रहिवासी तथा सेवानिवृत कर्मचारी बापुराव गोटमवाड यांच्या नेतृत्वाखालील नागरिकांच्या शिष्टमंडळाने संबंधित प्रशासनाला प्रदूषणयुक्त पाण्याचा तत्काळ बंदोबस्त करावा अन्यथा सामुहिक आमरण उपोषणाला सुरुवात करण्यात येईल, असा इशारा एका लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

या निवेदनावर बापुराव गोटमवाड यांच्यासह एच. के. कदम, सावित्रीबाई पुरावाड, सहदेव दोसलवार, मनोहर दुधगावकर, संजय धुमाळ, शंकर तेलंग, भूमीला जंजाळ, माधुरंजनी श्रीमंगले, सविता दुधगावकर, रावसाहेब कदम, बालाजीराव घडे, सुधाकर ओतलवाड, प्रदीपराव पुरी, प्रशांत तेलंग, दत्ता तंगलवाड, रुपाली पातेवार, अनिलकुमार मुपडे, गणेश बोन्लावार, सतिशराव लारे, प्रमोद दोमलवाड, विकास जळकोटे, जनाबाई बापुराव गोटमवाड,आदित्य पुरी, दिलीप तेलंग, राजेश्वर आलेगावकर, नागेश पुरी, अशोक श्रीमवार आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



**कंधार** – नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप आणि जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांचा संगमवाडी ग्रामस्थांकडून सत्कार करण्यात आला. यावेळी डीवायएसपी अश्विनी जगताप यांच्यासह संगमवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच चक्रधर घुगे, तंटामुक्ती अध्यक्ष गोपीनाथ घुगे, ग्राम पंचायत सदस्य भानुदास घुगे, माजी सरपंच संभाजी घुगे, माजी सरपंच परमेश्वर घुगे, दगडोबा घुगे, कोंडीबा करेवाड, रामदास घुगे, बंडू घुगे, रोहिदास करेवाड आदी उपस्थित होते.

## जुन्या वादातून एकावर प्राणघातक हल्ला; एकाला जबर दुखापत

**नांदेड (प्रतिनिधी)**– माहूर तालुक्यातील सायफळ येथे जुन्या भांडणाच्या कारणावरून एकावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. यात पायाला जबर दुखापत झाली असून, ही घटना १८ मार्च रोजी सकाळी आठच्या सुमारास घडली.

माहूर तालुक्यातील सायफळ येथे राहणारा शेतकरी रामराव मारुती राऊत (वय ४४) याचे आकाश कैलास मांडवकर यांच्यात जुन्या भांडणाच्या कारणावरून हाणामारी झाली.

## धर्माबाद नगर परिषदेचा कर्मचारी एसीबीच्या कोठडीत; गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**–धर्माबाद येथे १५ हजार रुपये लाच स्वीकारणाऱ्या येथील नगर परिषदेतील कर्मचाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडून त्याच्याविरुद्ध धर्माबाद पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. त्याला न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने २४ मार्चपर्यंत पोलीस कोरडी पाठवले आहे.

१८ मार्च रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे एका व्यक्तीने तक्रार दिली की, नगर परिषद धर्माबाद येथील कर्मचारी दत्तु पोशट्टी गुर्जलवाड (वय ५२) हे माझ्या कामासाठी लाच मागत आहेत. तक्रारदाराचे धर्माबाद नगर पालिकेच्या हद्दीत शिवाजीनगर येथे घर क्रमांक ४३८, ४४१ आणि त्यांच्या आईच्या नावे घर क्रमांक ४४३ अशी तीन घरे आहेत. तक्रारदारांच्या वडिलांनी या घराच्या क्षेत्रफळांच्या नोंदी नगर परिषद धर्माबादमध्ये करून घेण्यासाठी सन २०२० ते २०२४ दरम्यान अनेक अर्ज केले आहेत. पण धर्माबाद नगर परिषद-मधील लिपीक दत्तू गुर्जलवाड यांनी त्यांच्या वडिलांच्या कामासाठी १५ हजार रुपये लाच द्यावी लागेल असे सांगितले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १९ आणि २० मार्च रोजी लाच मागणीची पडताळणी केली. तेंव्हा पुन्हा एकदा १५ हजार रुपये आणि त्याच्यासाठी प्रत्येक प्लॉटचे १००० रुपये असे एकूण १८ हजार रुपये मागितले. त्यानंतर तक्रारदाराने विनंती केल्यानंतर दत्तू गुर्जलवाडने १५ हजार रुपये स्वीकारण्यास सहमती दर्शवली. दि. २१ मार्च रोजी पोलिसांनी धर्माबाद नगर परिषद कार्यालयात रचलेल्या सापळ्यात लिपीक दत्तू गुर्जलवाडने १५ हजार रुपयांची लाच घेतल्यानंतर त्याला ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या अंगझडतीमध्ये ७७५ रुपये आणि एक मोबाईल सापडला. त्यांच्या घराची झडतीही घेण्यात आली. पोलीस अधीक्षक संदीप पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरु आहे.







**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com